पुण्यनगरी

# ध्येयानेच रोजगार निश्चिती : डॉ. गुरव

कोल्हापूर : अधिकचे ज्ञान, कौशल्य, क्षमता व वाचन याबरोबर विद्यार्थ्यांनी रोजगाराभिमुख ध्येय निश्चित करून शिक्षण पूर्ण केल्यास रोजगार निश्चित मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.बी.ए. या अभ्यासक्रमांतील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या माजी विद्यार्थी मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे होते. प्रास्ताविक समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख सहायक प्रा. दत्तात्रय कमलाकर यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी केले व आभार डॉ. नितीन रणदिवे यांनी मानले.

तरूण भारत

# ‘उर्जा व पर्यावरणीय समस्या’वर शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** जागतिक ओझोन दिनी शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभाग, इंडियन सोसायटी फॉर हिटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग सर्विसिंग सेक्टर सोसायटी आणि इन्स्टिट्यूशनइनोवेशन कौन्सिल, यांच्या संयुक्त विद्यमाने “ऊर्जा आणि पर्यावरणीय समस्या“वर कार्यशाळा घेण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. यावेळी सुरेश पाटील, पी. पी. पुंगावकर, सुनील भाटवडेकर, संदीप चोदनकर, डॉ. एस. एन. सपली यांची प्रमुख उपस्थिती होती.

तरुण भारत

# ‘उर्जा व पर्यावरणीय समस्या’वर शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : जागतिक ओझोन दिनी शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभाग, इंडियन सोसायटी फॉर हिटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग सर्विसिंग सेक्टर सोसायटी आणि इन्स्टिट्यूशन इनोवेशन कौन्सिल, यांच्या संयुक्त विद्यमाने ‘ऊर्जा आणि पर्यावरणीय समस्या’वर कार्यशाळा घेण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. यावेळी सुरेश पाटील, पी. पी. पुंगावकर, सुनील भाटवडेकर, संदीप चोदनकर, डॉ. एस. एन. सपली यांची प्रमुख उपस्थिती होती.